सायं दैनिक

# शक्ती झुंजार

अन्याय विरुद्ध वाचा फोडणारा निर्भीड व निपक्ष

संपादक :– संतोष राम काळे

वर्ष १ ले, अंक २४५ वा | पुणे, मंगळवार २५ जून २०२४ | पृष्ठे–६, किंमत : रुपये ५.०० |

Title - Code :-MAHMAR52803, - SDM/SR/67/2023

VOL NO- 1, ISSUE- 245 | PUNE, TUESDAY, 26 Jun 2024 | PAGES- 6, PRICE : Rs. 5.00 |

# संत निवृत्तीनाथ दिंडीत नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या सहभाग





नाशिक,दि.२५ :– नाशिक पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करणारी श्री संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांची पालखी सोमवारी सकाळी सिन्नरपर्यंत पोहचली. नाशिकजवळील पळसे येथील मुक्कामानंतर पालखी सिन्नरच्या दिशेने निघाली असता नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी सात किलोमीटर पायी चालत दिंडीची अनुभूती घेतली.

नाशिकरोड येथून रविवारी संत निवृत्तीनाथ महाराज यांची पालखी दिंडी दुपारच्या सुमारास मार्गस्थ झाली. पळसे गावात रात्री मुक्काम करून सोमवारी सिन्नरच्या दिशेने पालखी निघाल्यावर शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांनी दिंडीत प्रत्यक्ष सहभाग घेतला. कर्णिक यांनी डोक्यावर पांढरी टोपी, कपाळी गंध टिळा तर गळ्यात टाळ घेतले. उपायुक्त राऊत यांनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन हरी नामाचा गजर करत पळसे गाव ते चिंचोली गाव असे सात किलोमीटर पालखी सोहळ्यात सहभाग घेतला. वारकऱ्यांच्या भजनाला कर्णिक हे प्रतिसाद देत होते. सहायक आयुक्त संदीप मिटके, नाशिकरोड पोलीस ठाण्याचे निरीक्षक रामदास शेळके यांसह अन्य अधिकारीही दिंडीत सहभागी झाले होते.

सोमवारी (ता.२४) चिंचोली फाट्यावर आगमन, मोहदरी घाटातून नाथांची पालखी पास्ते घाटमार्गे पास्ते आणि तिथून लोणारवाडीत मुक्कामी. व मंगळवारी (ता.२५) सिन्नर मार्गे ही पालखी कुंदेवाडी, मुसळगाव येथून दातलीत आल्यानंतर तेथे पहिले गोल रिंगण सोहळा होईल. त्यानंतर खंबाळे येथे दिंडीचा मुक्काम होईल. शेवटच्या तिसऱ्या दिवशी भोकणी, सुरेगाव, मरहळ, निऱ्हाळे मार्गे नगर जिल्ह्यातील पारेगाव येथे दिंडी मुक्कामी जाईल. ११ गावांतून जाणारी ही पायी दिंडी दोन ठिकाणी मुक्काम करेल. तालुक्यातून ६० किलोमीटरचा प्रवास वारकऱ्यांना करावा लागेल.